**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**तहकुब सभा परिपत्र**

महिला व बाल कल्याण समितीची तहकुब झालेली सभा ( बुधवार दिनांक १३/१०/२०१६ रोजी कोरम अभावी तहकुब झालेली सभा) बुधवार,दिनांक २६/१०/२०१६ रोजी दुपारी ३=२५ (तीन वाजून पंचवीस मि.) वाजता म. ज्योतीबा फुले सभागृहात (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत कार्यपत्रिका क्र.१३,दि. ११३/१०/२०१६ वरील विषय क्र. ७० ते ७४ चा विचार होईल

नगरसचिव
पुणे महानगरपालिका

**पुणे महानगरपालिका**
**महिला व बाल कल्याण समिती**
**कार्यपत्रिका क्र.१४**

महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार,दिनांक २६/१०/२०१६ रोजी दुपारी ३=३० ( साडे तीन ) वा. म.ज्योतिबा फुले सभागृह (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्र. ७५**
**मा.सौ.उषा कळमकर,अध्यक्षा,महिला व बाल कल्याण समिती, मा.सौ .लक्ष्मी दुधाने,मा.सौ.विजया वाडकर, मा.सौ. रंजना मुरकुटे, मा.सौ. लक्ष्मीताई घोडके यांचे दि. १२.१०.२०१६ चे पत्र.**

सन २०१६–१७ चे अंदाजपत्रकामधील घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील तरतूदीमधून महिला व बाल कल्याण समितीतील सर्व मा.सभासदांच्या प्रभागामधील ओला व सुका कचरा गोळा करणेकरिता र.रु.२ लाख रकमेच्या प्लास्टिक बकेट किंवा ढकलगाडी उपलब्ध करुन देण्यात याव्यात .

**विषय क्र. ७६**
**मा.सुधीर जानजोत, मा.राहूल तुपेरे व मा.अजय तायडे यांचे दि. १४.१०.२०१६ चे पत्र.**

भवानीपेठ घरांक ७५३ कमलमळा याठिकाणी १० ते १२ सीट्स शौचालय आहेत. सध्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत घरटी शौचालय बांधले जात आहेत. या वस्तीमध्ये बहुतांश घरात शौचालय बांधलेले आहेत. परंतू काहींना जागा नसल्यामुळे वैयक्तीक शौचालय बांधता आले नाहीत .

सध्या सार्वजनिक शौचालयाची संख्या जास्त आहे. आणि सार्वजनिक शौचालय खूप जुने झालेले आहेत. अन्य भागातील नागरिक त्याचा गैरवापर करतात . ते शौचालय पाडून सार्वजनक नळकोंडाळ्याला लागून असलेल्या जागेत २+२ पुरुष व स्त्रीयांसाठी बांधण्यात यावेत आणि ते शौचालय पाडण्यात यावेत.

तो रस्ता वहिवाटीचा असल्यामुळे त्यांना जाण्या – येण्यासाठी अडचण होत आहे.

**<u>विषय क्र. ७७</u>**

**<u>मा.सुधीर जानजोत, मा.राहूल तुपेरे व मा.अजय तायडे यांचे दि. १४.१०.२०१६ चे पत्र.</u>**

महानगरपालिकेतील सेवकांना ,सेवानिवृत्त सेवकांना आपल्या महानगरपालिके मार्फत वैद्यकीय सेवा १००% व ९० % दिली जाते. यामध्ये पेन्शनधारक नसणाऱ्या सेवकांचा सुध्दा समावेश करण्यात यावा .

या सेवकांना वैद्यकीय सेवेचा लाभ सेवानिवृत्तीनंतर देण्यात यावा. २००५ नंतर सेवेत दाखल झालेल्या सेवकांना पेन्शनचा लाभ मिळणार नाही . त्यांची अवस्था सेवानिवृत्तीनंतर अत्यंत बिकट होणार आहे. म्हणून हा लाभ त्या सेवकांना देणे गरजेचे आहे.

**<u>विषय क्र. ७८</u>**

**<u>मा.सौ. चंचला कोद्रे यांचे दि. १९.१०.२०१६ चे पत्र.</u>**

प्रभाग क्र.२० मधील राजश्री शाहू विद्यालय मुंढवा येथील इंग्रजी माध्यमाचे ९ वी व १० वी चे वर्ग आयटीच् मुव्हमेंट ऑर्गनायजेशन व पुणे महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने चालविण्यात यावेत.

**<u>विषय क्र. ७९</u>**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शैक्षणिक योजने अंतर्गत इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यां साठी पुढील शिक्षणासाठी अर्थसहाय्य योजना आहे. या योजनेमध्ये संस्था / महाविद्यालय प्रमुखांची प्रवेश घेतल्याची शिफारस घेतली जाते. परंतू काही विद्यार्थी मेडिकल अथवा बाकीच्या प्रवेशासाठी १२ वी नंतर अभ्यासासाठी एक वर्षासाठी प्रवेश घेत नाहीत.त्यामुळे त्या विद्यार्थ्यांना संस्था / महाविद्यालय प्रमुखांची शिफारस मिळत नाही व हे विद्यार्थी या योजने साठी अपात्र ठरतात. तरी या विद्यार्थ्यांचाही या योजनेसाठी समाविष्ट करण्याबाबत मा. सौ. विजया वाडकर यांचे दि.२४/८/२०१६ चे पत्रावर झालेला महिला व बाल कल्याण समिती ठराव क्र. ६८, दिनांक २४/८/२०१६ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचेकडील जा. क्र.मआ/ सविवि/६६४, दिनांक १०/१०/२०१६ ने पाठविलेला अभिप्राय .

**<u>विषय क्र.८०</u>**

**<u>मा.किशोर विटकर यांचे दि. ३.८.२०१६ चे पत्र.</u>**

प्रभाग क्र.१५ जनतानगर , नवी खडकी याठिकाणी जुने शौचालय आहे. ते मोडकळीस व नादुरुस्त झाल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे. या शौचालयाच्या जवळच नवीन २०-२० सिट्सचे शौचालय बांधण्यात आले असल्याने नागरिक त्याचा वापर करीत आहेत. तरी सदरचे जुने शौचालय पाडण्यात यावे

**( सदर विषयाची जागा पहाणी दि.१३/१०/२०१६ रोजी करण्यात आली )**

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**